# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ 652 /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- 23 /०८/२०१८

## " बलात्कार करणाऱ्या आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे पवनी अंतर्गत मौजा चिखली येथिल बाळु रामचंद्र फुलबांधे यांचे शतावरील नविन घराचे बांधकामा करीता मजुर पिडित महिला, वय ३० वर्ष हिचे वर सहकारी मजुर नामे प्रमोद अरविंद गजभिये, वय ३८ वर्ष रा. साठगाव, ता. चिमुर जिल्हा चंद्रपुर याने बलात्कार केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक २३.०८.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व ३००० रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहीती अशी की, पिडित महिला वय ३० वर्ष हि पोलीस ठाणे पवनी अंतर्गत येणारे ग्राम चिखली येथिल बाळु रामचंद्र फुलबांधे यांचे शेतावरील घराचे बांधकामा करीता ग्राम साठगाव, ता. चिमुर जिल्हा चंद्रपुर येथिल सहकारी महिला मजुर तसेच प्रमोद अरविंद गजभिये यांचे सोबत १० दिवसापासुन मजुरी काम करण्याकरीता येत जात होते. दिनांक १३.०६.२०१५ रोजी नेहमी प्रमाणे फुलबांधे यांचे शेतावरील घराचे कामावर सहकार्यासोबत १०.०० वा. सुमारास आली. दिसवसभर मजुरी काम करून सायंकाळी ५.०० वा. सुमारास घर मालक फुलबांधे हे निघुन गेले व सहकारी महिला मजुर सुध्दा निघुन गेल्या त्यानंतर त्याठिकाणी पिडित महिला व मजुर प्रमोद अरविंद गजभिये हे दोघेच बांधकाम सुरू असलेल्या घरी हजर होते. प्रमोद गजभिये याने सदरचे ठिकाण शेतावरील असुन कोणीही व्यक्ती नसल्याचा सुना मोक्का पाहुन सदर मजुर पिडित महिलेस जबरीने पकडुन घराचे आतील खोलीत नेवुन बलात्कार केला अशी तक्रार पिडित महिलेने पोलीस ठाणे भिसी जिल्हा चंद्रपुर येथे दिली. परंतु सदर घटणेचे ठिकाण पोलीस ठाणे पवनी जिल्हा भंडारा अंतर्गत येत असल्याने पोलीस ठाणे भिसी येथिल पोलीसांनी पिडित महिलेचे तक्रारी वरून खबरेची नोंद करू गुन्हयासंबंधी कागदपत्र तात्काळ पोलीस ठाणे पवनी येथे सादर करून आरोपी प्रमोद अरविंद गजभिये, वय ३८ वर्ष रा. साठगाव, ता. चिमुर जिल्हा चंद्रपुर याचे विरूध्द अप. क्र. ६३/१५ कलम ३७६ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक प्रभाकर बोरकुटे यांनी सुरु करुन गुन्हयातील आरोपी प्रमोद अरविंद गजभिये, वय ३८ वर्ष रा. साठगाव, ता. चिमुर जिल्हा चंद्रपुर यास तात्काळ अटक करून पिडित महिलेचे व आरोपीची वैद्यकीय तपासणी करून गुन्हयात साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने आरोपपत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ५५/१५ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता, सत्र**

**न्यायालय भंडारा** यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २३.०८.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी प्रमोद अरविंद गजभिये, वय ३८ वर्ष** याचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३७६ भादवि मध्ये सात वर्ष सश्रम कारावास व ३०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्या आली**. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, चंद्रशेखर चकाटे, ठाणेदार पोलीस ठाणे पवनी यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार चंद्रशेखर पटले/७७९ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.